तातडीचे.

क्रमांक-४/[१४]नमाशा/मा.शा.परवानगी/
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे-१
यांचे कार्यालय,
दि

20 FEB 1992

प्रति,
सचिव,
पन्नालाल रतनलाल आगरवाल ट्रस्ट
पुणे

विषय :- सन. १९९१.९२ या शै.वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : मा.उपसचिव,शिक्षण व सेवायोजन विभाग,यांचेकडील पत्र क्र.एसएसएन/१०९१/ /माशि-१ दिनांक ३.२.९२

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९ ... विना-अनुदान तत्वावर/कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब ... नवीन माध्यमिक शाळा,माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

[१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त]शासन निर्णय,शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन१०८८/१६६९-एन/माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेश बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ.बी.सी.च्या ] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे हमीपत्र त्वरीत या कार्यालयाकडे पाठवावे.

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत तसेच प्रवेशा वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज]कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती]नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल. V. Imp

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यांत येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी, शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

[ ]इतर अटी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमा खाली नोंदणी आवश्यक आहे.

२] संस्थे विरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] ज्या संस्थांना परवानगी आदेश मिळाल्यानंतर शाळा सुरू करणे शक्य होणार नाही. अशा संस्थांनी १९९२-९३ पासून नूतनीकरणा बाबत ~~डिसेंबर ९१~~ फेब्रुवारी ९२ पूर्वी शिक्षणाधिकारी व या कार्यालया मार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

त्या बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.न. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. | बन्सीलाल रामलाल आगरवाल ट्रस्ट | [illegible]बाडी | इ. ८ वी आठवी जून १९९१ पासून | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमा प्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्षरीकार शि. उ. सं. यांची

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतिलिपी.

शिक्षणाधिकारी [माध्य] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित त्यांनी वरील नविन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थे विरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्या बाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-[illegible] कडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.